महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.-१६३(३)/२०१९/१४-ब दिनांक:- १५ सप्टेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय :- महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा- २०१९ च्या पसंतीक्रमाबाबत
संदर्भ :- जाहिरात क्र. ०४/२०१९ आणि अधिसूचना क्र. १२/२०१९.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा २०१९ च्या मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांकडून सहायक वनसंरक्षक, गट-अ आणि वनक्षेत्रपाल, गट-ब या दोन संवर्गाकरीता दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ ते दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत पसंतीक्रम (Preference) मागविण्यात आले होते. तथापि, वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमांतील शैक्षणिक अर्हतेसंदर्भातील तरतुदींमधील संदिग्धतेमुळे काही उमेदवारांना वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गाकरीता पसंतीक्रम देता येत नसल्याच्या तक्रारी आयोगाच्या कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या.

२. प्रस्तुत तक्रारींच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाकडून वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाकरीताच्या शैक्षणिक अर्हतेच्या तरतुदीसंदर्भात शासनाकडे अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार शासनाकडून दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ च्या पत्रान्वये "वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमातील नियम ५(ii) नुसार विज्ञान शाखेव्यतिरिक्त अन्य शाखेतील गणित विषयासह पदवी धारण करणारे व विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणारे उमेदवार वनक्षेत्रपाल पदासाठी पात्र ठरतील", असे आयोगास कळविण्यात आले आहे.

३. यापूर्वी दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ ते दिनांक १९ ऑगस्ट, २०२१ या कालावधीमध्ये पसंतीक्रम सादर करु न शकलेल्या तसेच दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये प्राप्त अभिप्रायानुसार वनक्षेत्रपाल, गट-ब संवर्गासाठी पसंतीक्रम देण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता पसंतीक्रम सादर करण्याकरीता वेबलिंक पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यानुसार पसंतीक्रम सादर करण्यासंदर्भात उमेदवारांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Post Preference या लिंकवर क्लिक करावे.
(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा- २०१९ परीक्षेची निवड करावी.
(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.
(३) उपलब्ध होणा-या नमुन्यामध्ये पसंतीक्रम नमूद करुन सादर करावेत.

४. पसंतीक्रम सादर करण्याकरीताची सदर वेबलिंक **दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी १२.०० वा. पासून १९ सप्टेंबर, २०२१ रोजी २३:५९ वाजेपर्यंत** सुरु राहील.

५. उमेदवारांचे पसंतीक्रम प्राप्त झाल्यानंतर अंतिम निकालविषयक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल.

ठिकाण:- मुंबई

उपसचिव (परीक्षा- २)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई